# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबईतील बहुतांश झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१) १९१७ (०६-०४-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ५ लाख प्रस्तावित घरांचे पुनर्वसन करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून यापैकी प्रत्यक्षात हस्तांतरण केलेल्या घरांची संख्या २ लाख ६ हजार एवढीच असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सुमारे १ हजार झोपडपट्टी प्रकल्प (एसआरए) प्रलंबित असुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे या योजनेचे वेग मंदावले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या अनेक योजना प्रंलबित असून काही प्रकल्पांचे बांधकाम बंद आहेत तसेच प्रकल्पातील रहिवाशांना वेळेवर भाडे मिळत नसून संक्रमण शिबिरे व्यवस्थित नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्थिक कारणांमुळे देखील मुंबईतील खाजगी भूखंडाप्रमाणेच म्हाडा वसाहतीतील पुनर्वसन योजना देखील प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रंलबित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्र्यांनी दिले असुन त्यांच्या निर्देशाप्रमाणे उक्त प्रकल्पांना गती देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (११-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत विविध कारणांमुळे एकूण ३८१ झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे व अभय योजना राबविण्यास दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने अपूर्ण योजना पूर्ण करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेशातील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्यासाठी एस.आर.ए. व इतर स्थानिक स्वराज्य संस्था /प्राधिकरणे/महामंडळे यांच्या संयुक्त भागीदारीत (Joint Venture)राबविण्यास दि.२१.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**नाशिक पोलीस आयुक्त (जि.नाशिक) यांनी कार्यालयाच्या हद्दीतील बिगो जुगारवर केलेल्या कार्यवाहीच्या माहितीबाबत**

**(२) ३२४२४ (२५-११-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पोलीस आयुक्त (जि.नाशिक) यांनी कार्यालयाच्या हद्दीतील शहरात बिगो जुगारवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांना दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीनुसार सदर माहिती अद्यापही न मिळाल्याने माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२४) :** (१) होय,

(२) सदर प्रकरणी त्र्यंबक पोलीस ठाणे अंतर्गत ३०६/३४ भा.दं.वि. प्रमाणे दि.२१.०१.२०२१ रोजी दाखल सीसीटीएनएस गु.र.क्र.११/२०२१ बाबतची माहिती नाशिक ग्रामीण जिल्हा अंतर्गत पोलीस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे यांनी mcukdl@rediffmail.com व namdevsasane२०१९@gmail.com या ई-मेलवर दि.२७.१०.२०२१ रोजी पाठविली आहे.

तसेच नाशिक पोलीस आयुक्तालयातील ऑनलाईन रौलेट/बिंगो जुगाराच्या दाखल गुन्ह्यांची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे, नाशिक शहर यांनी दि.०९.१०.२०२२ रोजी पोस्टाव्दारे व वर नमूद ई-मेल वर पाठविली आहे. माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

**आंबेगाव खुर्द, जांभूळवाडी (जि.पुणे) येथील पाझर तलावातील गाळ अनेकवर्ष काढला नसल्याबाबत**

**(३) ३८९८५ (०१-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव खुर्द, जांभूळवाडी (जि.पुणे) येथील पाझर तलावात मिसळणारे मैलायुक्त पाणी, भराव टाकून होणारी अतिक्रमणे आणि वाढती जलपर्णी अशा विविध समस्यांचा विळखा पाझर तलावाला पडला असल्याचे माहे दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तलावातील गाळ अनेक वर्ष काढला नसल्याने तसेच बाजूंनी अतिक्रमणे होत असल्यामुळे तलावाचे बुडीत क्षेत्र कमी होत असून याकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले , तद्अनुषंगाने तलावातील गाळ त्वरीत काढण्याबाबत तसेच अतिक्रमणे हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(i) जांभूळवाडी तलाव हा पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असल्यामुळे लाभक्षेत्रात नागरीकरण झाले आहे. सदर तलावात काही प्रमाणात मैलायुक्त पाणी मिसळत आहे तथापी आता पुणे महानगरपालिके मार्फत तलावाचे कडेने नव्याने मैलापाणी वाहून नेणारी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे.

(ii) नागरीकरण झाल्याने संपूर्ण लाभक्षेत्र पुणे शहरात असल्यामुळे तलावाच्या पाण्याचा वापर होत नसल्याने व तलावामध्ये मिसळत असलेल्या सांडपाण्यामुळे पाणी साठून राहिल्याने जलपर्णी वाढलेली होती. सदयस्थितीत स्थानिकांचे मागणीवरून सदर तलाव पुणे महानगरपालिके कडे हस्तांतरण करणेचे प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.
सदर तलावाचे बुडीत क्षेत्र कमी झालेले नाही. या तलावातील पाण्याची मागणी नसल्याने व नागरीकरणामुळे प्रकल्पास सिंचनासाठी लाभक्षेत्र शिल्लक नसल्याने तलावातील गाळ काढण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) भूमी अभिलेख, हवेली या कार्यालयाकडून मौजे आंबेगाव येथील लघु पाटबंधारे तलावाची मोजणी झालेनंतर सीमांकन कायम करून सदर तलावाच्या हद्दीत अतिक्रमण झाले आहे की नाही? याबाबत पडताळणी करून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील जोगेश्वरी गुंफा परिसरातीलपुष्कर्ण ब्राम्हण वाडी व जयंत चाळ येथील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४) ४२३९४ (१८-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील जोगेश्वरी गुंफा परिसरात गत ५० वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या जयंत चाळ, जमुना निवास व पुष्कर्ण ब्राम्हणवाडी या झोपडपट्टी / बैठयाचाळी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता विकासकामार्फत सन २००४ मध्ये निष्कसित करून सन २००५ मध्ये विकासकाने झोपडीधारकांसमवेत विकास करारनामा केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तीन चाळींपैकी जमुना निवास या चाळीतील पात्र झोपडीधारकांचे गुंफेच्या केंद्रबिंदूपासून १०० मीटर अंतराबाहेरील क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून पुनर्वसनाचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सद्य:स्थितीत सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जयंत चाळ व पुष्कर्ण ब्राम्हण वाडी या चाळी गुंफेच्या केंद्र बिंदूपासून २५ मीटरच्या क्षेत्रात असून यापैकी जयंत चाळीच्या पुनर्विकासाबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही सुरू नसून पुष्कर्ण ब्राम्हणवाडी चाळ निष्कासित करून त्याठिकाणी सन २००८ आधी इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून सदरहू इमारतींमध्ये केवळ अंतर्गत सुविधा उपलब्ध करून देणे बाकी होते, तथापि सद्य:स्थितीत या चाळीतील रहिवाशी या अपूर्ण इमारतीमध्ये जीव मुठीत घेवून वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुष्कर्ण ब्राम्हण वाडी निष्कासित करून बांधण्यात आलेल्या इमारतीस ओ.सी.देण्याबाबत अथवा सदरहू बाब शक्य नसल्यास पुष्कर्ण ब्राम्हण वाडी व जयंत चाळ यामधील पात्र रहिवाशांकरिता गुंफेच्या केंद्रबिंदूपासून १०० मी. क्षेत्राबाहेर म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास योजना राबवून सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत अथवा सदरहू चाळीतील पात्र झोपडीधारकांना पीएपी च्या माध्यमातून हक्काच्या सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे
(५) अद्याप पुष्कर्ण ब्राम्हण वाडी व जयंत चाळ येथील पात्र झोपडीधारकांना सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व सदरहू झोपडीधारकांना त्यांच्या न्याय हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (११-०३-२०२४) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन गुंफेच्या केंद्रबिंदुपासून १०० मी. पर्यंत कुठल्याही बांधकामास अथवा निष्कासनास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे विकास करारनामा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन गुंफेच्या केंद्रबिंदुपासून २५ मीटर पर्यंत कुठल्याही बांधकामास अथवा निष्कासनास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे अंतर्गत सुविधा उपलब्ध करुन देणे व तेथील रहिवाशी अपूर्ण इमारतीत वास्तव्य करीत आहे ही बाब खरी नाही.

(४) सदर बाबतीत गुंफेच्या केंद्रबिंदुपासून १०० मीटर पर्यंत येणाऱ्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचे काम मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(५) सदर कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

---

## मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, या शहरातील झोपडपट्टीवासीयांना सशुल्क घर शासनाने जाहीर केलेल्या योजनेनुसार पात्र ठरविण्याबाबत

**(५) ४६१२७ (२५-०९-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, दिनांक ०२ जानेवारी, २००० ते दिनांक ०१ जानेवारी, २०११ या दरम्यान शहरातील किती झोपडपट्टीवासीयांना सशुल्क घर शासनाने जाहीर केलेल्या योजनेनुसार पात्र ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पात्र घोषीत होण्यास विलंब होत असल्याने सर्व सक्षम यंत्रणा एकाच ठिकाणी आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व पुरावे असतांनाही एखादा झोपडपट्टीवासीय अपात्र केला गेला असल्यास त्याला सक्षम यंत्रणेकडून पात्र करण्याची किती प्रकरणे आतापर्यंत निकाली काढलेली आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
झोपडी दिनांक १.१.२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत दि. १६ मे, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार मुंबईमध्ये ३११७, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे येथे ११, पुणे येथे १८५ व नागपूर येथे निरंक झोपडपट्टीवासीयांना सशुल्क पुनर्वसन योग्य ठरविण्यात आले आहे. नाशिक येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नाही.

बृहन्मुंबईतील प्रशासकीय कामामध्ये एकवाक्यता व सूसुत्रता आणण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा नव्याने पुनर्रचित करुन झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्याकरिता सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई यांच्या नियंत्रणाखाली केंद्रीकृत यंत्रणा दि. १४.७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली आहे.
(३) शासन निर्णय दि. १६.५.२०१८ नुसार झोपडीधारकांनी जोडपत्र ३ व ४ नुसारअर्ज केल्यास सबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडून पात्रतेबाबतची कार्यवाही केली जाते. सबंधित सक्षम प्राधिकारी यांनी झोपडीधारकास अपात्र ठरविल्यास त्याविरुध्द अपिलीय प्राधिकाऱ्याकडे झोपडीधारकाला अपील दाखल करता येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसद-उमरखेड-महागांव (जि.यवतमाळ) येथे अप्पर पोलिस अधिक्षक व निवासी जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याबाबत

**(६) ४६८२३ (३१-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद-उमरखेड-महागांव (जि.यवतमाळ) येथे मागील सहा महिन्यापासून कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अतिसंवेदनशील असल्याने पुसद उपविभाग बनवून पुसद येथे अप्पर पोलिस अधिक्षक व निवासी जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याची मागणी स्थानिकांमधून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०४-२०२४) :** (१),(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी स्थानिकांकडून मागणी झालेली नाही. परंतु (१) पुसद (२) दारव्हा (३) उमरखेड उपविभाग हा कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून अतिसंवेदनशील असल्याने सदर तीन उपविभाग मिळून पुसद येथे अपर पोलीस अधीक्षक दर्जाचे पद निर्माण करणेबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास मागणी केली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, निवासी जिल्हाधिकारी पद निर्माण करण्याच्या अनुषंगाने कोणतेही निवेदन उपविभागीय अधिकारी पुसद व उमरखेड यांचे कार्यालयाकडे प्राप्त नसल्याचे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी त्यांच्या दि.२३.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे.

---

## सिन्नर (जि.नाशिक ) तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उंबरदरी धरणाचा पश्चिमेकडील सांडवा खचल्याबाबत

**(७) ५०२३५ (०१-११-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील पश्चिम भागाला वरदान ठरणा-या ठाणगाव जवळील उंबरदरी धरण परिसरात अतिवृष्टीने धरणाचा पश्चिमेकडील सांडवा खचल्याने सांडव्यास धोका निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार तात्काळ धरणाच्या दुरुस्तीकरिता शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, सदर धरणाची क्षेत्रीय पाहणी केली आहे.

पाहणी अंती असे निदर्शनास आले आहे की, सदरचे लघु पाटबंधारे धरणाचे काम सन १९९२ साली पुर्ण झाले असून त्यात पुर्ण क्षमतेने पाणी साठा होत आहे.

या धरणाचा पश्चिमेकडील सांडवा दगडी बांधकामात असल्याने त्यातुन अनेक ठिकाणी गळती आढळून आली आहे. तसेच सांडवा खचलेला नसुन, फक्त सांडव्याच्या कडेच्या काही भागातून दगड अतिवृष्टी काळात निखळले आहेत. त्या अनुषंगाने सदर सांडव्याचे दुरुस्ती करुन मजबुतीकरण करणे गरजेचे आहे.

सदर तातडीच्या दुरुस्तीसाठीची आवश्यक उपाय योजना या वर्षीच्या पर्जन्योत्तर कामांमध्ये समाविष्ट करण्यात येत असून सांडव्याची दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच सदर धरणाचा सांडवा पुर्ण लांबीत मजबुतीकरण व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक अंतर्गत, आपत्ती व्यवस्थापन मधील आपत्ती सौम्यीकरणांतर्गत रक्कम रु.१.०५ कोटी इतक्या रकमेची आवश्यकता असुन, सदरचा निधी प्राप्त होताच या सांडव्याचे मजबुतीकरणाचे व इतर अनुषंगिक कामे हाती घेवून प्राधान्याने पुर्ण करण्यात येतील
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत**

**(८) ५०३६० (०१-११-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुचर्चित धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी आता चौथ्यांदा जागतिक पातळीवर निविदा काढण्याचे निश्चित करण्यात आले असून निविदेची मूळ किंमत ३१५० कोटींवरून १६०० कोटी करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात सादर होणारी निविदा १२ हजार कोटींपर्यंत जाण्याची शक्यता या क्षेत्रातील जाणकार वर्तवत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक नवीन शासन आल्यानंतर धारावी पुनर्विकास प्रकल्पाची फक्त घोषणा केली जात असून दरवर्षी या प्रकल्पामध्ये फक्त किमतीमध्ये वाढ करण्यात येत असून प्रत्यक्षात अंमलबजावणी काहीच होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धारावीकरांचा प्रत्यक्ष पुनर्विकास व्हावा यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-०२-२०२४) :** (१) व (२) धारावीतील सर्व सेक्टर्सचा (सेक्टर क्र. १ ते ५) पुनर्विकास शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ०५.११.२०१८ व दिनांक २८.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार विशेष हेतू कंपनीमार्फत (SPV) एकत्रितरित्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता धापुप्रा, मुंबई कार्यालयाने दिनांक ०१.१०.२०२२ रोजी मुख्य भागीदाराच्या नेमणुकीकरिता जागतिक निविदा मागविल्या होत्या.

धारावी पुनर्विकास प्रकल्पामध्ये रेल्वे जमिनीच्या निश्चित उपलब्धतेमुळे पात्र रहिवाश्यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरण करण्याकरिता द्यावे लागणारे भाडे, झोपड्याचे निष्कासन तसेच स्थलांतर करण्याकरिता लागणारा खर्च इ. करिता अंदाजे रु. १६०० कोटी इतका निधी गुंतवणूकदारास प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता सुरुवातीस लागणार नाही. त्यामुळे पूर्वीच्या निविदेमध्ये ठेवण्यात आलेल्या निविदादाराची प्रकल्पाकरिता अधिकतम गुंतवणूक रु. ३१५० कोटी ऐवजी रु. १६०० कोटी इतकी अधिकतम गुंतवणूक असावी. अशी अट ऑक्टोबर, २०२२ मधील निविदा दस्तऐवजामध्ये ठेवण्यात आली होती. निविदा प्रक्रियेअंतर्गत मे. अदानी प्रॉपर्टीज लि. यांनी रु. ५०६९/- कोटी इतक्या अधिकतम रकमेची निविदा सादर केलेली आहे.

त्यामुळे प्रत्यक्षात सादर होणारी निविदा १२ हजार कोटी पर्यंत जाण्याची शक्यता जाणकार वर्तवत आहेत, ही बाब धारावी पुनर्विकास प्रकल्प कार्यालयास अवगत नाही.

(३) मा. मंत्रीमंडळाने दिनांक २२.१२.२०२२ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार गृहनिर्माण विभागाने दिनांक १३.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये धारावी अधिसुचित क्षेत्रांतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता मुख्य भागीदार म्हणून मे. अदानी प्रॉपर्टीज प्रा. लि. यांची नियुक्ती करण्याबाबत मान्यता दिली आहे. तद्नंतर धारावी पुनर्विकास प्रकल्प कार्यालयाने पत्र क्र. SRA/DRP/ENG/LoA/F.No. ४५७/६१५/२०२३ , दिनांक १७.०७.२०२३ अन्वये मुख्य भागीदार मे. अदानी प्रॉपर्टीज प्रा. लि. यांना स्वीकृती पत्र (Letter of Award) जारी केले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील शाळांमधील विद्यार्थिनीवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना

**(९) ५०८२५ (२४-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शाळांच्या स्वच्छतागृहांमध्ये किंवा शाळा इमारतींच्या परिसरात विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचाराच्या घटना माहे ऑगस्ट/सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस विभागाकडे गुन्ह्यांची नोंद झाली आहे काय,

(३) असल्यास, ह्या प्रकरणांची पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष आणि अनुषंगिक शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०२४) :** (१) व (२) माहे ऑगस्ट / सप्टेंबर, २०२२ मध्ये पुणे शहरात कॉलेजच्या बाहेर गेटजवळ विद्यार्थिनींवर लैगिक अत्याचाराची १ घटना उघडकीस आली आहे. सदर प्रकरणी येरवडा पोलीस स्टेशन गु.र.क्र.४६९/२०२२, कलम ३५४(ड), ३२३, ५०४, ५०६, महा. पो. अधि. कलम ३७ (१) (३)/१३५ बाल लैगिंक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम कलम १२ अन्वये दि.२८.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आली असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर रुग्णालयाची निवड महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर करण्याबाबत

**(१०) ५०८४२ (१७-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पोलीस कर्मचाऱ्यासह परिवारांना कॅन्सर आजारावर तातडीने औषधोपचार होण्यासाठी सर्वसोयीने युक्त नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटलची महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर निवड करणेकरीता रितसर प्रस्ताव महासंचालक कुलाबा मुंबई यांच्याकडे पाठविलेला असंताना सुध्दा या हॉस्पीटलची अद्यापही पॅनलवर निवड करण्यात आलेली नसल्याची माहिती माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास,नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटलची महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर निवड करणेबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनीं पोलीस महासंचालक कुलाबा मुंबई यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटलची महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर निवड होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१),(२) व (३) पोलीस आयुक्त, नागपूर च्या दिनांक ०१.११.२०२१ पत्रान्वये नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पीटलची महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर निवड होणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक या कार्यालयास प्राप्त झाला. याबाबत लोकप्रतीनिधी यांचे दिनांक १२.०९.२०२२ रोजीचे लेखी निवेदन प्राप्त झाले. सदरहू योजनेअंतर्गत खाजगी रुग्णालयांना पॅनलवर घेण्याकरीता अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म.रा. मुंबई यांचे अध्यक्षतेखाली निवड समितीच्या पार पडलेल्या बैठकीमध्ये नागपूर

येथील राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पीटलचा विचार करण्यात आला आहे. परंतु नागपूर येथे पॅनलवरील रुग्णालयाची संख्या पुरेशी असल्याने सदर रुग्णालयाची निवड करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भत नाही.

---

**अमरावती येथील "लव्ह जिहाद " प्रकरणाबाबत**

**(११) ५१६७५ (१७-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :**सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील रुक्मिणीनगर परिसरातून बेपत्ता झालेल्या १९ वर्षीय तरुणीचा शोध लागल्यानंतर कथित " लव्ह जिहाद " प्रकरणाला वेगळे वळण मिळाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही तरुणी रागाच्या भरात घरातून निघून गेल्याचे प्राथमिक चौकशीतून समोर आले असून हिंदुत्ववादी संघटनांच्या लव्ह जिहादच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे कायदा व सुव्यवस्था बिघडवणा-या हिंदुत्ववादी संघटनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२४) :** (१) व (२)

दिनांक ०६/०९/२०२२ रोजी राजापेठ पोलीस स्टेशन येथे १९ वर्षे वयाच्या तरूणीची बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल झाली. पुढे तपासा दरम्यान बडनेरा, नाशिक व सातारा येथील रेल्वे स्टेशनवरील सिसिटीव्ही फुटेज तपासले असता सदरची मुलगी एकटीच असल्याचे दिसुन आले. नंतर हरविलेली मुलगी ही दिनांक ०७/०९/२०२२ रोजी सातारा येथे मिळुन आल्याने तिचे सातारा पोलीसांनी घेतलेल्या बयाणात तिने ती एकटीच आली असल्याबाबत सांगीतले. तिला पोलीस स्टेशन राजापेठ येथील स्टाफने सातारा येथुन ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन राजापेठ येथे आणुन तिचे सविस्तर बयाण नोंदविले असता तिने सांगीतले की, तिला डिएमएलटी कोर्स करावयाचा होता परंतु घरचे लोकांनी प्रतिसाद न दिल्याने ती रागाचे भरात घरातुन एकटीच निघुन गेली होती व तिला कोणीही पळवुन नेलेले नव्हते तसेच तिच्यासोबत कोणताही अनुचित व्यवहार झाला नाही असे सांगीतल्याने तिचे सविस्तर बयाण नोंदवुन नंतर तिला पालकांचे ताब्यात देण्यात आले.

काही संघटनांकडून सदर प्रकरण लव्ह जिहादचे असल्याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. परंतु बेपत्ता मुलगी मिळुन आल्यानंतर तिच्या घेतलेल्या बयाणावरुन व मिसिंगच्या चौकशीवरुन वर नमूद केल्याप्रमाणे वस्तूस्थिती निदर्शनास आली आहे.
(३) सदर प्रकरणी दिनांक १०/०९/२०२२ रोजी पोलीस स्टेशन राजापेठ येथे लव्ह जिहादचे खोटे आरोप लावल्याने एन.सि.क्रं. १७०२/२०२२ कलम ५००,५०६ भा.दं.वि. अन्वये दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथे राज्यव्यापी कर्मचारी संपाच्या वेळी बंदोबस्ताचा कर्तव्यभत्ता होमगार्ड सैनिकांना देण्याबाबत**

**(१२) ५३०२० (२४-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथे दिनांक ०४ एप्रिल, २०२२ ते दिनांक १४ एप्रिल, २०२२ या कालावधीत झालेल्या राज्यव्यापी कर्मचारी संपाच्या वेळी होमगार्ड सैनिकांनी बंदोबस्त केलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंदोबस्ताचा कर्तव्यभत्ता अद्यापही होमगार्ड सैनिकांना देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्तव्यभत्ता तात्काळ उपलब्ध करुन देण्याची मागणी वारंवार जिल्हाधिकरी, चंद्रपूर यांच्याकडे करुनही होमगार्ड सैनिकांचा कर्तव्यभत्ता थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने होमगार्ड सैनिकांचा थकीत असलेला कर्तव्यभत्ता तात्काळ अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४)
जिल्हा समादेशक, होमगार्ड, चंद्रपूर यांनी होमगार्ड सैनिकांचा कर्तव्य भत्ता तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार केला होता. तथापि, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि.२८/११/२०२२ च्या पत्रान्वये, पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याने होमगार्डसैनिकांच्या कर्तव्य भत्त्याची पुर्तता करता येणार नाही, असे कळविले असल्याने विलंब झालेला आहे.
त्यानंतर होमगार्ड मुख्यालयाने चालु वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून सदर रक्कम अदा करण्याबाबत कळविल्यानुसार एकूण २० होमगार्डसचे कर्तव्य भत्त्याची रक्कम रु.७४,०४०/- जिल्हा समादेशक, होमगार्ड, चंद्रपूर यांच्याकडून संबंधित होमगार्डसच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर येथे राहणारी सदिच्छा साने ही मुलगी वांद्रे येथील बॅडस्टॅड परिसरातून बेपत्ता झाल्याबाबत**

**(१३) ५६६२६ (३०-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर येथे राहणारी एमबीबीएस शिकणारी सदिच्छा साने ही मुलगी वांद्रे येथील बॅडस्टॅड या परिसरातून दि. २९ नोव्हेंबर २०२१ पासून बेपत्ता असून अद्यापही तिचा शोध लागला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वांद्रे पोलिसांनी दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी अपहरणाच्या गुन्हयाची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तरूणीच्या बेपत्ता होण्याच्या मागे घातपाताच्या संशयावरुन पोलिसांनी चायनिज खाद्यपदार्थ विक्रेता मित्तु सिंग आणि त्याचा मित्र जब्बार असारी यांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदिच्छा साने हिचा शोध लवकरात लवकर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) व (२) दिनांक २९.११.२०२१ रोजी सदिच्छा साने ही मुलगी बेपत्ता झाली असल्याची तक्रार बोईसर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे. सदर प्रकरणी बोईसर पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ००/२०२१ कलम ३६३, ३६४ (अ) भा. दं.वि., दि.०९.१२.२०२१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा दि.२८.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये कक्ष -९, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई गु. प्र. शा. गु. र. क्र. १०१/२०२१ यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी मिथु सुखदेव सिंग व अब्दुल जब्बार सत्तार अन्सारी यास दि. १३.०१.२०२३ रोजी पोलीसांकडून अटक करण्यात आली होती.
(४) होय, मिथु सिंग याने सदर गुन्हयातील बळीत मुलगी स्वदिच्छा साने हिचा खून करून पुरावा नष्ट व्हावा म्हणून तिचा मृतदेह, तिच्या बॅग व इतर साहित्य समुद्रामध्ये टाकून दिले असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने नमुद गुन्ह्यात दिनांक २०.०१.२०२३ रोजी भा.द.वि. कलम ३०२, २०१, ३४ ची वाढ करण्यात आली आहे. सदर प्रकरण तपासाधिन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरक्षित भूखंडावर एसआरए व म्हाडाने बांधलेल्या इमारतीतील महापालिका शाळा सुरु करण्याबाबत**

**(१४) ५६७५७ (२८-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात व उपनगरात आरक्षित भूखंडावर एसआरए व म्हाडाने बांधलेल्या इमारतीतील ६५ इमारती महापालिका शाळांसाठी दिल्या जाणार असून यापैकी फक्त आठ इमारतींचा ताबाच महापालिकेला मिळाला असून यात महापालिका शाळा सुरु करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित इमारतींचा ताबा मागील ५ ते १० वर्षांपासून प्रलंबित असून परवानग्या व इतर कारणांनी इमारतींचा ताबा प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीचा ताबा माहापालिका शाळाना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२२-०३-२०२४) :** (१) विकास नियंत्रण नियमावली, १९९१ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या विनियम ३३ (१०) अंतर्गत सुरु असलेल्या एकूण ६८ झो.पु. योजना ह्या विकास आराखड्यामधील शाळेच्या आरक्षणाने बाधित होत आहेत. सदर नियमावलीतील तरतुदीनुसार शाळेचे आरक्षण बांधून महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात येते. सदर आरक्षणाने बाधित योजनांपैकी एकूण १३ शाळा महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत व ०४ शाळा हस्तांतर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच ३१ शाळांचे काम प्रगतीपथावर असून सदर शाळा लवकरच महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात येतील, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

एकूण ६८ शाळांपैकी १३ शाळा महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. तसेच ०४ शाळांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे व ३१ शाळांच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित २० पैकी १२ शाळेच्या इमारतीस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बांधकामाची परवानगी देण्यापूर्वी महानगरपालिकेची प्रस्तुत आराखड्यांकरिता पूर्वपरवानगी प्राप्त करणे तसेच अग्निशमन दल व महानगरपालिकेच्या इतर विभागांचे अभिप्राय प्राप्त करणे आवश्यक असल्याने सदर शाळांच्या बांधकामास परवानगी देण्यास विलंब होत आहे. उर्वरित ०८ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांपैकी ०३ योजनांमध्ये प्रवर्तन निदेशालयाने स्थगिती दिल्यामुळे, ०३ योजनांमध्ये विकासकावर झोपडपट्टी कायद्याच्या कलम १३(२) अन्वये कारवाई करण्यात येत असल्यामुळे, ०१ योजनेमध्ये विकासक व झोपडीधारकांची संख्या यांच्यामधील वादामुळे व ०१ योजना न्यायालयीन बाबीमुळे रखडलेल्या आहेत. त्यामुळे सदर बांधकामे बांधून हस्तांतरीत करण्यास विलंब होत आहे, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमधील आरक्षणे हस्तांतरित केल्याशिवाय विक्री घटकाच्या इमारतीच्या ७५% वरील घटकास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत नाही व तशी तरतूद विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम १७(३)(D)(b)(६)मध्ये करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महिलांवरील अत्याचाऱ्याच्या वाढत्या घटनाबाबत

**(१५) ५६९२३ (०८-०५-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या सन २०२१ च्या अहवालानुसार राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्याच्या घटना वाढत असून देशात घडणाऱ्या महिला अत्याचाऱ्याच्या घटनांपैकी ९.२२ % घटना राज्यात होत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहरणाच्या १ हजार१५५ अल्पवयीन मुलींसह एकुण १ हजार १६४ जणी बेपत्ता झाल्या आहेत. अपहरणाच्या दाखल गुन्ह्यांपैकी १ हजार ४७ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. तर ११० गुन्हातील बेपत्ता मुली अद्याप सापडल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलासुक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा तपशील काय आहे,

(३) असल्यास .शक्ती कायद्यानुसार महिलासुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे मुल्यांकन किंवा पुनर्विलोकन करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२४) :** (१) देशात घडणाऱ्या महिला अत्याचाराच्या घटनांपैकी ९.२२% घटना राज्यात घडल्या आहेत.

(२) Crime in India २०२१ अहवालानुसार अपहरण मुली व महिला यांची माहिती

| सन २०२१ मधील अपहरण व अपनयन मुली व महिला (भा.द.वि. कलम ३६३ ते ३६९) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अपहरण व अपनयन महिला व मुली | | | | | शोध लागलेल्या बळीत | शोध लागलेल्या बळीतांची टक्केवारी | शोध न लागलेल्या बळीत (५-६) |
| सन २०११ | | | मागील वर्षापर्यंत शोध न लागलेल्या महिला व मुली | एकुण अपहरण महिला व मुली (३+४) | | | |
| अपहरण व अपनयन मुली | अपहरण व अपनयन महिला | सन २०२१ एकुण अपहरण व अपनयन महिला व मुली | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ७९१८ | ५४२ | ८४६० | ४६८६ | १३१४६ | ८४४६ | ६४.२% | ४७०० |

(३) व (४) राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंधक करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत प्रकरण निकाली काढण्याकरीता मुंबई येथे एक विशेष न्यायालय स्थापन व कार्यरत आहे. हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते. राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षतेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी, निर्भया पथक, दामिनी पथक या उपाययोजना करण्यात येत आहे. राज्यात सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. शक्ती कायदा मा. राष्ट्रपती महोदयांकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून अद्याप मान्यता प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबईतील माहिम येथील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाश्यांना थकीत भाडे तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) ५७०९२ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम येथील गेली १० वर्षे प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजने मध्ये दोन वर्षापर्यंत भाडे देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन असून पुनर्विकास प्रकल्पात प्रलंबित असलेल्या प्रकल्पांना स्वयंपुनर्विकासाचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल, असे मा.उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास विधानसभेत आश्वासन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे मंजूरी दिलेल्या व कार्यरत असलेल्या किती एसआरए योजनांमध्ये दोन वर्षाहून अधिक काळ भाडे थकीत ठेवण्यात आले असून शासनाने दिलेल्या आश्वासनाचा तथा निर्णयाचा प्रलंबित किती झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाश्यांना लाभ मिळणार आहे,

(३) असल्यास, प्रलंबित झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाश्यांना थकीत भाडे तातडीने उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबईमध्ये सुरु असणाऱ्या एकूण पुनर्वसन योजनांपैकी १२४ झोपु योजनांमध्ये रहिवाश्यांचे अंदाजित रु.६,१९,३७,४९,०००/- भाडे थकीत असल्याचे दिसून आले. तरी उपरोक्त योजनेचा लाभ सदर १२४ योजनांमधील पात्र झोपडीधारकांना होऊ शकेल.

(३) यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने परिपत्रक क्र.२१० निर्गमित केलेले आहे. झोपडीधारकास भाडे न देणाऱ्या विकासकास पात्र झोपडीधारकांचे भाडे अदा करण्याबाबत नोटीस देण्यात येते. नोटीस देऊनही विकासकाने भाडे अदा न केल्यास विकासकाच्या विक्री घटकाच्या बांधकामास Stop Work देण्यात येते. याउपरांतही विकासकाने भाडे न दिल्यास विकासकाविरुध्द कलम १३(२) अन्वये कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) अर्जुना नदी खोरे समृद्धी अभियानाअंतर्गत तब्बल २८ गावांचा सर्वांगिण विकास करण्याबाबत

**(१७) ५७३६६ (२४-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) अर्जुना नदी खोरे समृद्धी अभियानाअंतर्गत राबविण्यात आल्यानंतर त्यातून या नदीच्या काठावरील गावांचे सर्वेक्षण करून संभाव्य १०० कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला असून उक्त आराखड्यामध्ये जलसंधारणासह रस्ते, पर्यटन विकास आदी विविध कामांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या आराखड्यास शासनाची मंजुरी व आर्थिक तरतूद सादर करण्यात आल्यानंतर आजमितीस सदरहू आराखड्यास शासनाने मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर अर्जुना नदी काठावरच्या गावांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला विकास आराखडा विनाविलंब मंजूर करून आर्थिक तरतूद देणेबाबत शाासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१२-०३-२०२४) :** (१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) अर्जुना नदीच्या पुनर्जीवन कार्यक्रमास दिनांक १०/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये, तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत अध्यक्ष, जलयुक्त शिवार अभियान जिल्हास्तरीय समिती तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या दिनांक १६/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये, अर्जुना नदीवर ५ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधणेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सद्यस्थितीत ५ पैकी ४ कोल्हापुरी बंधाऱ्याची कामे प्रगतीपथावर असून एका बंधाऱ्याचे काम सुरु न झाल्याने दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर बंधाऱ्याचे काम रद्द करण्यात आले आहे.
(२) व (३), उपरोक्त ०४ कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या रु. २५२.९७ लक्ष इतक्या रकमेच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून दिनांक १८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## औष्णिक विदयुत केंद्र परळी वैद्यनाथ येथील प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१८) ५७४३४ (३०-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी वैद्यनाथ (जि.बीड) येथील महानिर्मितीच्या औष्णिक विदयुत केंद्र उभारणी दरम्यान जमिनी प्रकल्पास दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या नोकरी न मिळणे, निर्वाह भत्त्यात वाढ करणे, यासह ४५ वर्षांची वयोमर्यादा उलटल्यानंतर नोकरी न मिळाल्याने अन्याय झाला असणे आदी मागण्या अद्याप प्रलंबित असल्याने संबंधित प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी माहे जानेवारी २०२३, मध्ये वा त्यादरम्यान उपोषणास केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पासाठी २० ते ३० वर्षांपूर्वी संपादित केलेली जमीन आता परत घ्या, अशी भूमिका औष्णिक विदयुत केंद्र प्रशासनाने घेलत्याने सुमारे २५ प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला असून प्रत्यक्ष प्रकल्पाला जमीन देऊन व प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र असूनही अद्याप कोणताही लाभ न मिळालेल्या व लाभाची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांच्या मागण्या मान्य करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यसा, प्रकल्पग्रस्तांना मिळणारा निर्वाह भत्ता, वयोमर्यादा उलटलेल्या उमेदवारांना विशेष बाब म्हणून नोकरी/सवलती दिल्या जाव्यात तसेच प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या अडचणी सोडवल्या जाव्यात याबाबत शासन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) होय हे खरे आहे. महानिर्मिती कंपनीस महाराष्ट्र राज्य औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पग्रस्त कृती समिती, ता. परळी यांचे दि.१६.०१.२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) परळी-वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्राच्या विस्तारीकरणाकरीता मौजे दाउतपुर येथील गट क्र. २३२, २३८, २३९ व २४० मधील संबंधित जमीनीच्या कलम ४ अंतर्गत नोटीस ते मसुदा अवार्ड जारी करणे इत्यादी कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, परळी-वैजनाथ यांच्या कार्यालयाने (महसूल खाते) केली होती. परंतु सदरील प्रकल्पग्रस्तांचे मालकी हक्काबाबत विवाद असल्याने ते सदरील जमिनीचा ताबा महानिर्मिती कंपनीला उपलब्ध झाला नाही. प्रकल्पग्रस्तांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सन २०१३ च्या दाखल याचिकेतील निर्देशानुसार संबंधित प्रकल्पग्रस्तांची जमिन संपादनाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे.

तथापि, संबंधित मा.जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निर्गमित प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे महानिर्मिती कंपनीत प्रगत कुशल प्रशिक्षणावर परळी औविकेंद्र येथे रुजू असलेल्या २२ प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण बंद केले होते. त्यांना पुन:महानिर्मितीच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने पुन: घेण्यात आले परंतु त्यातील ०८ प्रकल्पग्रस्त शासनाच्या धोरणानुसार नातेसंबंधाच्या संज्ञेत मोडत नसल्याने (एकूण ०५ प्रकल्पग्रस्त उमेदवार) व काही प्रकल्पग्रस्तांच्या विरोधात गुन्हा दाखल असल्याने संबंधितांना प्रगत कुशल प्रशिक्षणावर रुजू करुन घेण्यात आले नाही व सद्य:स्थितीत ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

(३) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. प्रकल्प-१००६ /मु.स. ३९६/ प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.०३.०२.२००७ अन्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय / निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधिल पदावर नियुक्ती देताना वयोमर्यादेची अट सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे. महानिर्मिती कंपनीतर्फे सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करताना सदर शासन निर्णयांच्या अधीन राहून कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भादवड (जि.भिवंडी) येथे असलेल्या पोलीस वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(१९) ५८८६७ (२६-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरामध्ये पोलिस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी भादवड या ठिकाणी पोलिस वसाहत असून सदर पोलीस वसाहतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसाहतीची दुरावस्था झाल्याने अनेक पोलिस बांधव आपल्या कुटुंबासोबत जीव मुठीत घेऊन रहात आहे,

(३) असल्यास,वसाहत दुरुस्तीसाठी ३ वर्षापूर्वी तब्बल १० कोटी रूपये खर्च करूनही अनेक कामे प्रलंबित राहील्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) ,(२), (३), (४) व (५) भादवड पोलीस वसाहत, भिवंडी येथील इमारत क्र १ ते १३ ची इमारतींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

इमारत क्र.८,९,१० व १३ मधील पोलीस निवासस्थानांची पुर्नरचना व नूतनीकरण करावयाच्या कामासाठी रु. २,३२,५९,९६४/- इतका निधी खर्च झालेला असून तसेच वाढीव कामासाठी सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारीत रु. १,२८,३९,१२३/- इतक्या वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकानुसार होणा-या ३४७.४५ लाखाच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

इमारत क्र. १ ते ९ आणि इमारत क्र. ११ व १२ मधील पोलीस निवासस्थानांची पुर्नरचना व नूतनीकरण करण्यात आले पोलीस कर्मचारी वास्तव्य करत आहेत.

---

**भोर व वेल्हे, (जि.पुणे) जलसंधारण महामंडळातंर्गत मंजूर झालेली कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) ६०५३२ (२५-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर व वेल्हे, (जि.पुणे) तालुक्यातील जलसंधारण महामंडळातंर्गत मंजूर झालेल्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण होवून निविदेस मान्यता मिळाली असून कार्यारंभ आदेश देण्यासाठी व सदरची कामे तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे स्थानिक प्रतिनिधीनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भोर व वेल्हे (जि. पुणे) तालुक्यातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी मान्यतेनुसार सदर कामांच्या निविदांची प्रक्रिया पूर्ण करुन कार्यारंभ आदेश वितरीत करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरामध्ये पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(२१) ६०७३८ (०३-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयाची वाढती लोकसंख्या व गुन्हेगारी प्रकरणाची वाढते प्रमाण लक्षात घेता कोल्हापूर शहरामध्ये स्वतंत्र पोलीस आयुक्तालये स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस आयुक्तलयाचा प्रस्ताव २० ते २५ वर्षे शासन दरबारी प्रलंबीत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालय उभारणीसाठी पोलीस विभागाच्या मालकीच्या सर्व्हे क्र. ९५३/१- अ येथील सुमारे १.७८ हेक्टर जागा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, कोल्हापूर येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) व (२) कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत मा. विधानसभा सदस्य (कोल्हापूर उत्तर मतदार संघ) यांनी शासनास दिनांक १७ डिसेंबर, २०२२ रोजी पत्र सादर केले आहे.
कोल्हापूर पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.२५.०५.२०१६ च्या पत्राद्वारे शासनास सादर करण्यात आला आहे. उक्त प्रस्तावातील त्रुटींच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी पोलीस महासंचालक कार्यालयास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त सुधारित प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने "पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतचे धोरण निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत" कळविले आहे. त्यानुसार पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी धोरण निश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झाला असून, उक्त प्रस्ताव शासन मान्यतेसाठी विचाराधीन आहे.
(३) नवीन प्रशासकीय इमारत पोलीस विभागाच्या मालकीच्या सर्व्हे क्र.९५३/१-अ येथील १.८७ हेक्टर क्षेत्रफळाच्या जागेत पोलीस गृहनिर्माण मंडळामार्फत बांधणे व त्यासाठी आवश्यक तो निधी पुरविणे प्रस्तावित आहे.
(४) पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी धोरण निश्चित झाल्यानंतर कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतची पुढील कार्यवाही तपासून करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा वाढोणा, (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील शेतकऱ्याच्या शेतजमीनी संपादित करुनही जमीनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत

**(२२) ६०८१७ (२५-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वाढोणा, (ता.आर्वी,जि.वर्धा) येथील सिंचन तलावाला सन २००९- २०१० यादरम्यान मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाच्या कामाकरिता ५५ शेतकऱ्याच्या जमीनी संपादित केल्या असून मुल्यांकन सुध्दा करण्यात आले असून प्रकल्पाच्या भिंतीचे काम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकरण क्र.०९,एलएक्यु ४७/२०१७-२०१८, मोजा बेढोणा प्रकरण क्र.६०/एलएक्यु ४७/२००९-२०१० मोजा नागाझरी,ता.आर्वी,जि. वर्धा व प्रकरण क्र.०२८/एलएक्यु ४७/२०१७-२०१८ नुसार संपादित केलेल्या जमीनीचा मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने वर्धा येथील तलावाकरिता संपादित केलेल्या शेत जमीनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-०३-२०२४) :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) तलावाच्या कामांकरीता ५५ शेतक-यांच्या जमीनी नसून ४६ शेतक-यांच्या जमीनी संपादित करण्यात आलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सुधारित भूसंपादन कायदा-२०१४ नुसार योजनेसाठी जमीन सरळ खरेदीव्दारे संपादित करुन जिल्हाधिकारी तसेच जिल्हा भूसंपादन समितीव्दारे जमिनीचे मूल्यांकन करुन प्रमाणित करण्यात आले आहे. प्रस्तावास महसूल विभागाकडून दि.१५.७.२०१८ रोजी मूल्यांकन करुन प्राप्त झाले आहे. निधी प्रस्ताव दि.८.३.२०२१ रोजी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रादेशिक कार्यालयामार्फत सादर करण्यात आला आहे. दि. २३.८.२०२१ च्या निर्देशानुसार भूसंपादनाचे मोजमाप नोंदविण्यात आले आहे. जलसंधारण महामंडळाकडून सदर प्रकल्पाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर नियोजन विभागाने काढलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) कार्यवाही सुरु असून त्रुटींची पूर्तता करणे सुरु आहे.

---

## महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) ६४६३७ (०४-०९-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मानवी हक्क आयोगात न्यायाधिशांची अपुरी संख्या तसेच मंजूर ५४ पदांपैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त २८ पदे रिक्त असल्यामुळे आयोगाच्या कामकाजावर विपरित परिणाम झाला असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयोगाकडे सद्यस्थितीत २० हजार ७३७ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने वाढणाऱ्या तक्रारींची संख्या विचारात घेता प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी एक कार्यालय उभारणे तसेच न्यायाधिशांची संख्या वाढवून किमान सात/आठ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०२४) :** (१) ,(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगासाठी मंजूर असलेल्या एकूण ५४ पदांपैकी सद्यस्थितीत २७ पदे कार्यरत असून, २७ पदे रिक्त आहेत. शासनाने आयोगातील रिक्त पदे विचारात घेता, नियुक्ती प्राधिकारी- सचिव, राज्य मानवी हक्क आयोग यांच्यास्तरावर सेवाप्रवेश नियमानुसार भरावयाची पदे तसेच शासनाने २ वर्षाकरिता मंजूर केलेली एकूण १८ काल्पनिक पदे आवश्यकतेनुसार आयोगाच्या स्तरावर भरण्याबाबत आयोगास कळविले आहे. आयोगाकडून Pro-Bono Volunteers, Law Graduates व Graduate व्यक्तींना प्रति प्रकरण Incentive देऊन प्रलंबित प्रकरणांची कामे करून घेण्यात येत आहे.

तसेच आयोगात अध्यक्ष व २ सदस्य कार्यरत आहेत.

होय, हे खरे आहे. आयोगामध्ये मे, २०२३ दरम्यान साधारण २०,७३७ प्रकरणे प्रलंबित होती.

मानवी हक्क संरक्षण अधिनियमाच्या कलम २१ नुसार राज्य मानवी हक्क आयोगामध्ये १ अध्यक्ष व २ सदस्य असतील, अशी तरतूद आहे. आयोगातील सदस्य संख्या वाढविण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही.
प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर उपनगरातील २६० झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ६४७३७ (२९-०८-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर उपनगरात गेली अनेक वर्षे सद्यस्थितीतील प्रलंबित असलेल्या २६० झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी अभय योजने अंतर्गत ८ वित्तीय संस्थांनी दि.१६.०३.२०२३ रोजीच्या सुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अभय योजने अंतर्गत वित्तीय पुरवठा करणाऱ्या बँका, वित्तीय संस्था यांची अधिकृतपणे संयुक्त विकासक किंवा ऋणदाता म्हणून नोंद केली जाणार, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, माहे जून २०२३ अखेर पर्यंत २६० झो.पु. पुनर्वसन योजनांपैकी किती योजनांची कामे प्रत्यक्षात सुरु करण्यात आली असून ती कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दीष्टे ठेवली आहेत, तसेच अद्यापपर्यंत किती योजनांचे कामे प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, शासनाने यावर चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई शहर व उपनगरात सद्यस्थितीत वित्तीय विकासक अकार्यक्षमतामुळे न्यायालयीन बाबी, इतर विभागाकडून NOC सादर न केल्यामुळे अशा विविध कारणांमुळे २२२ झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडलेल्या आहेत. सदर रखडलेल्या योजना मार्गी लावण्यासाठी गृहनिर्माण विभागाने दि.२५.०५.२०२२ व ०९.१२.२०२२ रोजी अभय योजना करीता शासन निर्णय जारी केले आहेत. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जाहीर सुचनेद्वारे वित्तीय संस्थांकडून अभय योजनेंतर्गत अर्ज / प्रस्ताव मागितले होते. अद्यापपर्यंत १६ वित्तीय संस्था /विकासकांनी एकूण ४५ रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांकरीता अर्ज सादर केले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) माहे सप्टेंबर २०२२ अखेर पर्यंत एकूण ३८० रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना होत्या. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विविध प्रयत्नांती ऑक्टोंबर २०२३ पर्यंत सदर रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची संख्या कमी होऊन २२२ एवढी झाली आहे.

अशा रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याकरीता अभय योजनेशिवाय १) निविदा प्रक्रियेद्वारे विकासकांची नियुक्ती करणे. २) म्हाडा, सिडको, एमएमआरडीए अशा शासकीय यंत्रणेसोबत संयुक्त भागीदारी (Joint Venture) योजना पुर्ण करणे, अशा सर्व योजना पुढील ३ महिन्यांत सुरु करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडी शेवाडी (जि.धुळे) येथील मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(२५) ६४८०४ (३०-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडी शेवाडी (जि.धुळे) येथील मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला द्यावा, चुकीची केलेली मोजणी व संपादित क्षेत्राचा भाडेपट्टा मिळावा, या मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी धुळे जिल्हा प्रशासनास माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देऊन मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :**(१) अंशत: खरे आहे.

वाडी शेवाडी (जि.धुळे) येथील मध्यम प्रकल्पासाठी उजवा कालवा वितरीका क्र.१ व २ मध्ये मौजे शेवाडे, मौजे जखाणे व मौजे आरावे येथील संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा तसेच संयुक्त मोजणी ही पूर्ण गटनिहाय न होता पोट हिस्यानुसार करण्याबाबत तसेच संपादित क्षेत्राचा भाडेपट्टा रक्कम मिळणेबाबत दिनांक २३/०३/२०२३ रोजी शेतकऱ्यांनी लेखी निवेदन देवून मागणी केलेली आहे.

(२) भुधारकांच्या मागणीनुसार पोटहिस्सानिहाय संयुक्त मोजणी होणे कामी उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), क्र.१, धुळे यांना क्षेत्रिय कार्यालयाने सुचित केले असून भूमि अभिलेख कार्यालयामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.

भुसंपादन निवाडा कार्यवाही सत्वर होणेसाठी उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), धुळे यांचेकडे दि. १८/६/२०१९ व दि. १४/०५/२०२० रोजी अनुक्रमे रु.८०५.८९८ लक्ष रु.३५३.१११ लक्ष असे एकूण रु.११५९.००९ लक्ष जमा करण्यात आलेले आहे.

नविन भुसंपादन कायद्यातील कलम-२३ नुसार परिच्छेद क्र.३ (क) चा विचार करुनच अंतीम निवाडा पारीत केलेला असल्याने नविन कायद्यातील तरतुदीनुसार भाडेपट्टा देय नसल्याचा तसेच प्रकरणातील भूधारकांना नविन कायद्यातील तरतूदीनुसार अंतीम निवाडा पारित करतांना कलम-२८ मधील बाबी संबंधीतांनी विचारात घेतल्या नाहीत असे वाटत असल्यास ते जिल्हाधिकारी यांचेकडे तशा आशयाचे निवेदन देऊन त्यांच्या मागणीबद्दल निकाल लावू शकतात, मात्र प्राप्त परिस्थितीत नविन भुसंपादन कायदा-२०१३ नुसार भाडेपट्टा देय नसल्याबाबत महामंडळाचे विधी सल्लागार यांनी फेर अभिप्राय दिलेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत भाडेपट्टा देण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील शिवमंदिरात प्रवेश करण्यावरुन निर्माण झालेल्या धार्मिक तेढीप्रकरणी विशेष चौकशी समिती (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याबाबत**

**(२६) ६४८११ (२८-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), अ‍ॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील शिवमंदिरात तेथील संदल मिरवणुकीतील काही युवकांनी शिव मंदिरात प्रवेश करतांना सुरक्षा रक्षकांनी मनाई केल्यामुळे दिनांक १३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास वाद निर्माण झाल्याने धार्मिक तेढ निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी त्याठिकाणी पाहणी करुन तसेच दि १६ मे, २०२३ रोजी विशेष पोलिस महानिरिक्षक यांनी दिनांक १७ मे ,२०२३ रोजी वा त्यासुमारास पोलिस पथकासह त्र्यंबकेश्वर येथील स्थानिकांशी

चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संबंधितांविरुध्द अटकेची कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) तथापि, त्यानंतर त्र्यंबकेश्वर मंदिर घटनेप्रकरणी अतिरिक्त पोलिस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांचे अध्यक्षतेखाली, विशेष समिती (''एसआयटी) नेमून या घटनेसह गेल्या वर्षीच्या दंगल घडलेल्या घटनांची चौकशी करण्यांत येईल असे'' मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांनी घोषित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२४) :**
(१) होय.
(२) होय.
सदर प्रकरणी दोन धर्म, निरनिराळ्या गटांमध्ये शत्रुत्व वाढेल आणि एकोप्यास बाधा होईल तसेच सार्वजनिक शांतता भंग पाऊन लोकांमध्ये भिती निर्माण होईल व दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याच्या दृष्टीने कृत्य केल्याबद्दल सदर गुन्हयांतील ०४ आरोपी विरुद्ध त्र्यंबकेश्वर पो.ठा. येथे भादंवि कलम २९५,५११ प्रमाणे गु.र.क्र.१२४/२०२३ दाखल करण्यात आला आहे.
(३) होय.
सदर प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, अर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी शासनास दि.०६/११/२०२३ रोजी अहवाल सादर करण्यात आला असून त्यावर सदर अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकसमान (ता.खेड, जि.पुणे) येथील डावा कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला प्रलंबित असल्याबाबत**

**(२७) ६४८८० (०६-१०-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकसमान (ता.खेड, जि.पुणे) येथील डावा कालव्यासाठी १९९५ साली संपादित केलेल्या जमिनीचा आजतागायत मोबदला दिलेला नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबदला न दिल्याने सद्यस्थितीत सुरु असलेल्या बाजारभावानुसार तातडीने रक्कम मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी जलसंपदा तथा उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, मुख्य अभियंता, जलसंपदा, कार्यकारी अभियंता, चाकसमान प्रकल्प यांच्याकडे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२४) :** (१) होय.
(२) होय, अंशत: खरे आहे.

शेतकऱ्यांनी दि.१३.०४.२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे चासकमान डाव्या कालव्यासाठी संपादित जमिनीचा मोबदला किंवा भुभाडे न मिळाल्याने दि.२४.०४.२०२३ पासून बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे कळविले होते.
(३) चासकमान प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालानुसार मौजे साबळेवाडी/बहूळ येथील चासकमान डावा कालवा सा.क्र.६१/३५० येथून निघणारी वितरिका क्र.१० मधुन निघणारी सिध्देगव्हाण मायनर (मुख्य) व तिची उपचारी क्र.१ व २ करीता शासन निर्णय दि.१३.०१.२०१७ नुसार बंदिस्त नलिका वितरण प्रणाली (PDN) प्रस्तावित केल्याने जमीन संपादन करण्याची आवश्यकता नाही. मा. मंत्रिमंडळाच्या दि.१९.१२.२०२३ रोजीच्या बैठकीत चासकमान प्रकल्पास रू.१९५६.९५ कोटी किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रकरणी शासकिय नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना त्यांचे जमिनीचे भूभाडे रक्कम निधी उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही नियोजीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लिंगायत समाजाने आपल्या विविध मागण्यांसाठी आझाद मैदान येथे मोर्चा काढल्याबाबत

**(२८) ६५३९५ (०१-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लिंगायत समाजाने क्रांतिसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करणे तसेच बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे आदी विविध मागण्यांसाठी दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मधील समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-०२-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) लिंगायत समाजाच्या मागण्यांच्या अनुषंगाने लिंगायत समाजातील तरुण, सुशिक्षित बेरोजगार आणि नवउद्योजकांना स्वयंउद्योगासाठी अर्थसहाय्य देण्याकरिता शासन निर्णय क्रमांक-महामं-२०२३/प्र.क्र.२७/महामंडळे, दि. ०९ ऑगस्ट, २०२३ अन्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत "जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) स्थापन करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी १२ तास वीज देण्याबाबत

**(२९) ६५४६७ (२७-०९-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी १२ तास वीज देण्याबाबत शासनाने भंडारा येथे घोषणा केली असल्याचे माहे एप्रिल,२०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घोषणा प्रत्यक्षात अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

तथापि, वीजभार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार भंडारा जिल्हयासहीत संपुर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा ८ तास रात्री असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो. यामध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार महावितरण कंपनीस नाही. त्यानुसार सद्यस्थितीत संपूर्ण राज्यात एकूण कृषी भारापैकी सर्वसाधारणपणे ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांवर दिवसा ८ तास व उर्वरित सुमारे ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांवर रात्री ८ तास अशी वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. यात कोणताही बदल करण्याचा अधिकार महावितरण कंपनीस नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" ही दीर्घकालीन योजना आखली आहे व प्रधानमंत्री कुसूम योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगांव (जि.बुलढाणा) किरकोळ वादावरुन निर्दोषांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत

**(३०) ६५४७४ (२७-०९-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथे सन २०२२ मध्ये पोळयाच्या दिवशी काही व्यक्तींनी बैलाला मारले व त्यामुळे बैल उधळल्याने वाद निर्माण झाला, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, खामगांव येथे बैल पोळयाच्या दिवशी झालेल्या किरकोळ वादामुळे पोलीसांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्दोष व्यक्तीवर गुन्हे दाखल केले या निषेधार्थ खामगांव येथील नागरीकांनी खामगांव बंदचे आवाहन केले यावेळी संपुर्ण खामगांव शहर बंदमध्ये सहभागी झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव येथील किरकोळ वादाप्रकरणी निर्दोष व्यक्तींवर कलम३०८ व विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निर्दोष व्यक्तींवर नियमबाहय व अन्यायकारकरीत्या कलम ३०८ वइतर गुन्हे संगनमताने दाखल करणाऱ्या तत्कालीन अप्पर पोलीस अधिक्षक, खामगांव व तत्कालीनपोलीस उपविभागीय अधिकारी खामगांव व तत्कालीन पोलीस निरीक्षक शिवाजी नगर खामगांव यांच्यावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच निर्दोष व्यक्तींवर आवश्यकता नसतांना केलेली कलम३०८ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२४) :** (१) होय.

(२) खामगांव येथील नागरीकांनी त्यांची व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवली होती; परंतु निर्दोष व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आलेले नाही.

(३) व (४) नाही.

दि.२६/०८/२०२२ रोजी पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीमध्ये शितलमाता मंदिराजवळ पोळा सण साजरा करण्यात आला. त्यादरम्यान एका मुस्लिम मुलाने बैलाला लाथ मारल्याने गोंधळ झाला व जमाव पांगला गेला. मुस्लिम व हिंदू मुलांनी दगडफेक करून जातीय तणाव निर्माण करून शहराची शांतता व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशाचे उल्लंघन केले अशा रिपोर्टवरून शिवाजीनगर पो.स्टे. खामगाव येथे अप क्र.३१०/२०२२ कलम १४३,१४७,१४८,१४९,१६० भादंवि, सहकलम १३५ मुपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर दगडफेकीत २ व्यक्ती जखमी झाले असल्याने सदर गुन्ह्यात भादंवि चे कलम ३०८ समाविष्ट करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा. न्यायालयात दि.११/०८/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे .

सदर प्रकरणी निर्दोष व्यक्तींवर नियमबाहय् व अन्यायकारक कलम ३०८ तसेच इतर गुन्हे लावण्यात आलेले नाहीत.

(५) विलंब झाला नाही.

---

**बोरीवली (मुंबई) येथील गणेशनगर मागाठाणे एस आरए गृहनिर्माण संस्थेच्या विकासकाने बनावट स्वाक्षऱ्या करुन केलेला गैरव्यवहार**

**(३१) ६५८३४ (१०-१०-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिका हद्दीतील मुंबई बोरीवली पूर्व येथील गणेशनगर मागाठाणे रहिवासी एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण सह.संस्था मर्या.बोरीवली सर्व्हे नं.१८२ (१) पैकी १९१ या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मे.धनश्री डेव्हलपर्स तर्फे श्री. शंकर बोरकर यांनी सदरचा प्रकल्प मे. सूर्या बिल्डर्स यांच्याकडे हस्तांतरित केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मे.धनश्री डेव्हलपर्स यांनी दि. २४ सप्टेंबर, २०१६ पूर्वी मृत्यु झालेल्या सदनिका धारकांच्या खोट्या सह्या करून बोगस लाभार्थ्यांची नावे घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रकल्प मे. सूर्या बिल्डर्स यांच्याकडे हस्तांतरित करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मृत्यू पावलेल्या सदनिका धारकांच्या खोट्या सह्या करणाऱ्या मे.धनश्री डेव्हलपर्स यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२८-०३-२०२४) :**

(१) गणेश नगर मागाठाणे सह.गृह.नि.संस्थेसाठी वास्तुविशारद श्री.विवेक भोळे यांनी विकासक मे.धनश्री डेव्हलपर्स यांच्या वतीने प्रस्ताव दाखल केला होता. सदर योजनेला मान्यता देऊन दि.१८.०९.२००६ रोजी आशयपत्र निर्गमित करण्यात आले होते.

तद्नंतर विकासक मे.धनश्री डेव्हलपर्स यांनी योजनेचे काम सुरु न केल्यामुळे ११ वर्षे सदर योजनेचे काम स्थगित होते. त्यामुळे गणेश नगर सहकारी गृह.संस्थेने दि.२४.०९.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मे.धनश्री डेव्हलपर्स या विकासकाची नियुक्ती रद्द करुन नवीन विकासक मे.सुर्या बिल्डर्स यांची नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर करुन दि.१५.१०.२०१६ रोजी झोपु प्राधिकरणास नवीन विकासक नियुक्त करण्याबाबत विनंती केली.

त्यानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये दि.२३.१२.२०१६ रोजी विकासक मे.धनश्री डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करण्यात आली व नवीन विकासक मे.सुर्या बिल्डर्स यांची नियुक्ती दि.०३.०३.२०१७ रोजी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर बाबतीत अशी कोणतीही तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार कक्षास प्राप्त झालेली नाही.

(३) दि.२४.०९.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत गणेश नगर सहकारी गृह.संस्थेने मे.धनश्री डेव्हलपर्स या विकासकाची नियुक्ती रद्द करुन नवीन विकासक मे.सुर्या बिल्डर्स यांची नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर केला आहे. त्यानुसार सदर संस्थेमार्फत नवीन विकासकाची नियुक्ती करण्याची विनंती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला करण्यात

आली.

(४) मृत्यु पावलेले सदनिकाधारकांच्या खोट्या सह्या असल्याबाबतची कोणतीही तक्रार सहकार कक्षाकडे प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत अडीच लाख रुपयांत घरे देण्याच्या गृहनिर्माण विभागाच्या आदेशाबाबत**

**(३२) ६५८५५ (३१-०८-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा,निर्मूलन व पुनर्वसन अधिनियम १९७१ मधील तरतूदीनुसार राज्यातील महापालिका, नगरपालिका क्षेत्रातील दिनांक १ जानेवारी, २००० च्या संरक्षणपात्र झोपडीधारकांना मोफत घर देण्याचा तसेच दिनांक १ जानेवारी, २००० नंतरच्या आणि दिनांक १ जानेवारी, २०११ पूर्वीच्या झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) शासनाच्या या निर्णयाला अनुलक्षून एसआरए योजनेत सशुल्क पुनर्वसनाला पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांना पात्र करून त्यांच्याकडून वसूल करावयाच्या सदनिकेची किंमत ठरविण्यासाठी गृहनिर्माण विभागाने दिनांक ७ सप्टेंबर २०१८ रोजी परिपत्रक काढून एसआरएतील झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना त्यांच्या सदनिकेची किंमत निश्चित करताना प्रकल्पातील पुनर्वसन घटकांच्या एकूण बांधकाचा खर्च, प्रकल्पातील प्रस्तावित केलेल्या अत्यावश्यक व अन्य पायाभूत सुविधांच्या विकासासाठी येणारा खर्च एसआरएचा स्थिर दराचा इतर प्रशासकीय खर्च या तीन निकषांचा विचार करून एसआरएचे मुख्य अधिकारी किंमत जाहीर करतील असे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) गृहनिर्माण विभागाने दिलेल्या आदेशानुसार एसआरए प्राधिकरणाने सशुल्क झोपडीधारकांना अडीच लाखांत घर देण्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, एसआरएने प्राधिकरणाने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्ताव शासनाने मंजूरी दिली आहे काय त्यानुसार एकूण किती कुटुंबाना किती कालावधीत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (११-०३-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि.२५ मे, २०२३ नुसार सशुल्क पुनर्वसनयोग्य झोपडीधारकांच्या पुनर्वसन सदनिकेची किंमत रु.२.५० लाख इतकी निश्चित करण्यात आलेली आहे.

(४) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि. २५ मे, २०२३ नुसार सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकाच्या पुनर्वसन सदनिकेची किंमत रु. २.५० लाख इतकी निश्चित करण्यात आलेली असून, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि.१४ ऑगस्ट, २०२३ अन्वये सशुल्क पुनर्वसन सदनिकांच्या वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. आतापर्यंत २२०५ झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसन योग्य ठरविण्यात आलेले आहे. तर शासन निर्णय दि. १६ मे, २०१८ नुसार प्राप्त जोडपत्रानुसार / अर्जानुसार सशुल्क पुनर्वसन योग्य ठरविण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडून करण्यात येते.

सशुल्क पुनर्वसन योग्य सदनिकांबाबत शुल्क रु.२.५० लाख ही रक्कम भरणा करुन घेण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात दि.१६.१०.२०२३ पासून "सशुल्क कक्ष" सुरु करण्यात आलेला आहे. सशुल्क पुनर्वसन सदनिकांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर उपलब्धतेनुसार पुनर्वसन सदनिका वाटप करण्याची कार्यवाही शासन निर्णय दि. १४ ऑगस्ट, २०२३ मधील मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वडाळा येथील माटुंगा नवीन पोलीस वसाहती मधील अधिकारी व कर्मचारी यांना नायगाव पोलीस मुख्यालय पोलीस हॉ.गृहनिर्माण पुर्नविकास प्रकल्पात समाविष्ट करण्याबाबत

**(३३) ६५८६७ (२८-०८-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथील माटुंगा नवीन पोलीस वसाहती मधील अधिकारी व कर्मचारी यांना नायगाव पोलीस मुख्यालय पोलीस हॉ.गृहनिर्माण पुर्नविकास प्रकल्पात समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (वडाळा) यांनी उपमुख्यमंत्री यांना दिनांक १२ मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार अधिकारी व कर्मचारी यांना नायगाव पोलीस मुख्यालय पोलीस हॉ गृहनिर्माण पुर्नविकास प्रकल्पात समाविष्ट करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१),(२),(३) व (४) होय.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाने अहवाल सादर केला असून, त्याअनुषंगाने कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.

---

## गिरगाव (मुंबई) पोलिस वसाहतीची झालेली दूरवस्था

**(३४) ६५८८९ (२८-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरगाव (मुंबई) येथील विठ्ठलभाई पटेल मार्ग पोलिस ठाण्याच्या आवारात असलेली अनेक वर्ष जुनी सुमारे ६० खोल्यांची पोलिस वसाहतीची अक्षरश: जीर्ण झाली असून इमारतीचे जीने तुटले, इमारतीवरील छपरांना गळती लागली असून शौच्यालयाची दुरावस्था झाली असून सदर वसाहतीत राहणाऱ्या ४० पोलिस कुटुंबियांना जीव मुठीत धरुन रहावे लागत असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अनेक वेळा तक्रार करण्यात आली असून देखील याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विठ्ठलभाई पटेल मार्ग पोलिस ठाण्याच्या आवारात असलेल्या पोलीस वसाहतीचे पुनवर्सन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१), (२), (३) होय.

वि. प. मार्ग पोलीस वसाहतीतील रहिवाश्यांचे स्थलांतर करण्याबाबत कळविले. तथापि, रहिवाश्यांनी त्यांचे स्तरावर मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रकरणी वकिलाची व आर्किटेक्टची नेमणूक करून सदर वसाहतीचे परस्पर संरचनात्मक परीक्षण केले. त्या अहवालामध्ये सदर वसाहत दुरुस्तीयोग्य असून राहण्यास सुरक्षित असल्याचे नमूद केले आहे.

तसेच तेथील स्थानिक आमदार यांचे निधीतून इमारतीमधील आवश्यक त्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील सिंहगड रस्ता,धायरीत महावितरणाने अघोषित भारनियम केल्याबाबत

**(३५) ६५९०० (२७-०९-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सिंहगड रस्ता,धायरयी परिसरात महाविरणाने अघोषित भारनियम केल्यामुळे दिवसभारात सुमारे ६ तास वीज पुरवठा ठप्प केल्याने नागरिकांना व उद्योजकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील सदरील भारनियमामुळे लघुउद्योग व व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या परिसरातील अघोषित भारनियम रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

महापारेषण कंपनीकडून २२० केव्ही नांदेड सिटी या अति उच्चदाब उपकेंद्रामध्ये नियोजित महत्त्वाच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी दि. २०.०४.२०२३ रोजी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत (एकूण ९ तास) या कालावधीकरता वीज पुरवठा बंद करण्यात आला होता.

तसेच, त्याकरिता दिनांक २०.०४.२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये त्याची माहिती प्रसिध्द केली होती. पुणे येथील सिंहगड रस्ता, धायरी या परिसराला २२० केव्ही नांदेड सिटी अति उच्चदाब उपकेंद्रातुन वीज पुरवठा करण्यात येते असल्यामुळे त्यापरिसरात सदरील काळात वीज पुरवठा बंद होता.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेण (जि.रायगड) तालुक्यामध्ये असलेल्या खारभुमी योजनाचे नुतनीकरण करण्याबाबत

**(३६) ६५९०४ (२९-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यामध्ये एकूण ३६ शासकीय खारभुमी योजना असून बहुतांश योजनांचे नुतनीकरण होवून साधारणत: १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, यामधील १० खाजगी योजना असल्याने या योजनांवर शासन खर्च करीत नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, यामधील काही योजना कोकण आपत्ती सौमिकरण कार्यक्रमात समाविष्ट तर काही योजना (PLAN व NON PLAN) शासनाकडे अंदाज पत्रकास मंजूरी मिळून निधीच्या उपलब्धतेच्या प्रतिक्षेत आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी योजना शासनाने ताब्यात घेवून त्यांचेसह इतर योजनांचे नुतनीकरण करण्यासाठी आवश्यक निधी प्राप्त करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या खारभुमी योजनांचे समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण, होणारी अतिवृष्टी व येणारी उधाने यांपासून वारंवार खांडीं जाण्याचे होणारे प्रकार रोखण्यासाठी बांधांचे मजबुतीकरण / विस्तार व सुधारणा / दुरूस्ती करून भातशेतीचे होणारे नुकसान टाळण्याकरीता लवकरात लवकर आवश्यक निधी मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२४) :** (१) अंशत: हे खरे आहे.

पेण तालुक्यात एकुण ३० शासकीय खारभूमी योजना आहेत व त्यापैकी १३ योजनांचे नुतनीकरण होऊन १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वर नमुद केलेल्या ३० शासकीय योजनांव्यतिरिक्त १० खाजगी योजना असलेने त्यावर शासन खर्च करु शकत नाही.

(३) खाजगी योजना शासनाच्या ताब्यात नसल्याने त्यावर शासनास खर्च करता येत नाही. यामुळे खाजगी योजना कोकण आपत्ती सौम्यीकरण मध्ये घेतलेल्या नाहीत. परंतु पेण तालुक्यातील १३ शासकीय खारभूमी योजना कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केल्या असुन त्यापैकी ६ योजनांना शासन निर्णय क्रमांक आव्यप -२०२२/प्र.क्र.-९२/ आव्यप - २ दिनांक १४ सप्टेंबर २०२३ या अन्वये मंजुरी मिळाली असुन पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच वढाव बोर्झे या योजनेचा राज्यनिधी अंतर्गत सुप्रमा प्रस्तावाची तपासणी प्रदेश कार्यालय स्तरावर सुरु आहे. त्यास मंजुरी मिळताच पुढील कार्यवाही करणेत येईल. २४०२ मृद व जलसंधारण परिरक्षण व दुरुस्ती या नॉन प्लॅन च्या लेखाशिर्षाखाली रायगड जिल्ह्यास निधी प्राप्त झाला असुन उपलब्ध निधीनुसार काम करण्याचे नियोजित आहे.

(४) होय खरे आहे.

मा. आ. रविशेठ पाटील, पेण विधानसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री यांना दि. ०६/०२/२०२३ रोजी दिलेल्या निवेदनात पेण तालुक्यातील ३६ शासकीय योजनांच्या नूतनीकरणासाठी २०२३-२४ मध्ये रु. १० कोटीचा निधी मिळणेस विनंती केली आहे.

(५) सन २०२३-२४ या अर्थिक वर्षासाठी २४०२ विस्तार व सुधारणा लेखाशिर्षांतर्गत कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण- रायगड या विभागास रु. २०.०० कोटी किमतीची तरतुद करण्यांत आली आहे. तसेच २४०२ परिरक्षण व दुरुस्ती या लेखाशिर्षांतर्गत या विभागास रु. १.४० कोटी किमतीची तरतुद करण्यांत आली आहे. अंदाजपत्रकांना सक्षम स्तरावर मंजुरी प्राप्त होताच अनुदानाच्या उपलब्धतेनुसार कामे करुन घेण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली फोंडाघाट ( जि.सिंधुदुर्ग ) येथे बेकादेशीरित्या गुरांची कत्तल होत असल्याबाबत**

**(३७) ६६०५७ (२७-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली फोंडाघाट ( जि.सिंधुदुर्ग ) येथे बेकादेशीरित्या कत्तलीसाठी जाणा-या जनावरांच्या / गुरांची वाहतूक करणा-या टेम्पोस स्थानिक पोलिसांनी माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्या सुमारास ताब्यात घेतले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने गूरांची कत्तल करुन होणारी तस्करी रोखण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२४) :**

(१) स्थानिक पोलीसांनी दि. १२/०३/२०२३ रोजी सिंधुदुर्ग घटकामधील कणकवली, फोंडाघाट येथे गुरांची वाहतुक करणाऱ्या टॅम्पोस ताब्यात घेतले होते, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशी अंती एकूण ३ इसमांनी त्यांच्या ताब्यातील टॅम्पो मध्ये जनावरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने जनावरे दाटीवाटीने कोंबून, त्यांच्या चाऱ्याची व पाण्याची व्यवस्था न करता अकारण अडकवून बांधून, जनावरे वाहतूकीचा परवाना नसताना, वाहतूक करताना मिळून आले होते, त्यामुळे कणकवली

पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ९३/२०२३ प्राण्यांचा छळ प्रति. अधि.१९६० चे कलम ११ (१)(e), ११(१)(f), ११(१) (h), ११(१) (k) सह महा. प्राणी संरक्षण अधि.१९९५ चे कलम ५ अ, ५ ब, ९ सह मो.वा.अधिनियम कलम ६६/१९२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नमूद गुन्हयाचा तपास पूर्ण करून ३ आरोपींविरुद्ध दि.१५/०६/२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेआहे.

(३) सदर प्रकरणी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गुरांची तस्करी संदर्भातील बाब निदर्शनास आल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याबाबत पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडून निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरात अंमली पदार्थ्यांच्या तस्करीत होत असलेली वाढ**

**(३८) ६६१०७ (२७-०९-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात अंमली पदार्थ्यांच्या तस्करीत मुळे तरुणांच्या सेवेनात मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनमनगर, महाकाली गुंफा, दुर्गानगर, तक्षीला वाईन शॉप, श्री. इच्छापूर्ती गणेश मंदिर मार्ग तसेच लिली व्हाईट हाऊस परिसरात मोठया प्रमाणात अवैधरित्या अंमली पदार्थ्यांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अंमली पदार्थ्यांची तस्करी व विक्रीवर आळा घालण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) व (२) मे-२०२३ मध्ये मुंबई शहरात अंमली पदार्थ विरुदध केलेल्या कारवाईत २१२ केसेस दाखल करण्यात आले असुन एकूण २५० आरोपी अटक करण्यात आली आहेत. तसेच जोगेश्वरी परिसरामध्ये मे, २०२३ पर्यंत एकुण २१ गुन्हे नोंद करण्यात आले असुन २१ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

(३) अशा घटनांवर आळा घालण्यासाठी शासनामार्फत खालील उपायोजना करण्यात आल्या आहेत.

विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे “समन्वय अधिकारी” म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुन:रचना करण्यात आली असुन त्यानुसार दि ३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयान्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत. त्यांच्यामार्फत व स्थानिक पोलीस ठाणे यांच्यातर्फे अशासकीय संस्था व शासकीय व्यसनमुक्ती केंद्रे यांच्या समन्वयाने अंमली पदार्थांच्या विरोधात पोस्टर्स, बॅनर्स पथनाट्यद्वारे तसेच शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये E-Pledge अभियानाद्वारे जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवे (ता, पुरंदर, जि. पुणे) येथे रोहित्रे बसविण्याबाबत

**(३९) ६६३४८ (२७-०९-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवे (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील घवळीकडे जाताना नवी विहीरीजवळ दीड वर्षापासून रोहित्रासाठी जागा उपलब्ध करुन देखील रोहित्र बसविण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्र बसविण्यात न आल्यामुळे येथील गावात वीजेची समस्या कायम असल्यामुळे शेतकऱ्यांनमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रोहित्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर गावातील गायकवाड मळा या रोहित्रावर शेतीपंपाची १८ व इतर १९ कनेक्शन आहेत. त्याचा एकूण वीजभार १०६ कि.वॅट आहे. त्यामुळे विद्युत वाहिनीच्या शेवटी असणा-या ग्राहकांना कमी दाबाने विद्युत पुरवठा होत होता. सदरील रोहित्रांवरील विद्युत भार कमी करण्यासाठी कृषीपंप वीज जोडणी-२०२० अंतर्गत नवीन २२ के.व्ही., ६३ के.व्ही.ए. रोहित्र व ०.३० कि.मी. उच्चदाब वाहिनी, ०.१० कि.मी. उच्चदाब वाहिनीचे काम मंजूर करण्यात आले होते. उपरोक्त नमूद वाढीव रोहित्राच्या कामासाठी मे. रुद्र इंडस्ट्रिज, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर या ठेकेदार एजन्सीला महावितरण कंपनीच्या सासवड विभागामार्फत दि.०७.०३.२०२२ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदर ठिकाणी ठेकेदाराने रोहित्र व वाहिन्या उभारणीचे काम हाती घेतल्यानंतर स्थानिक अडथळयांमुळे काम अपुर्ण राहिले. सद्यस्थितीत स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करुन अडथळा दुर करण्यात आला असून, उर्वरित काम लवकरच पुर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी आस्थापना/जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरासंबंधि

**(४०) ६६४४९ (०३-०९-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असल्यास, राज्यात सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चित्रित झालेले चित्रीकरण बाहेर सोशल मीडिया तून व्हायरल होत असल्याचे बऱ्याच वेळा लक्षात आले आहे. यामुळे गोपनीयतेचा अधिकार (right of privacy) भंग होत असून यातून मानहानी करण्याचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी आस्थापना मध्ये / जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याची काही मार्गदर्शक तत्वे असून सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चित्रित झालेले चित्रीकरण कुणाला दाखवले गेले पाहिजे याबद्दल देखील काही मार्गदर्शक तत्वे आहेत काय,

(३) असल्यास, खाजगी आस्थापना मध्ये / जागेमध्ये होणाऱ्या चित्रीकरणाचे समाज माध्यमातून होणारे असे मानहानी प्रकार रोखण्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१), (२) व (३) राज्यात खाजगी आस्थापना मध्ये / जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चित्रित झालेले चित्रीकरण बाहेर व्हायरल होत असल्याबाबत अशी तक्रार राज्य पोलीसांकडे प्राप्त झाल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गुंदवली नगरभूक्रमांक ८३ (१ ते १७२) ८२ प्रकाशवाडी, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(४१) ६६७०६ (१०-१०-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गुंदवली नगरभूक्रमांक ८३ (१ ते १७२) ८२ प्रकाशवाडी, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्रकाशवाडी एसआरए गृहनिर्माण संस्थेतर्फे विकासक ओमकार रिय. डेव्हलपमेंट मार्फत प्रकल्प राबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पात पुरवणी पात्रता ठरविताना मूळ परिशिष्ट-२ मधून मूळ मालकांची नावे बदलून त्याजागी बोगस फोटोपास बनवुन इतर दुसऱ्या व्यक्तींची नावे समाविष्ट करून २० जणांची पुरवणीपात्रता ठरविताना उपजिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकरण-४, श्रीमती वैशाली लंबाटे यांच्या मदतीने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी श्री. नवीन रा.लादे, मुख्य प्रवर्तक, यांनी सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, जिल्हाधिकारी मुंबई, उपनगरजिल्हा, अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे प्रकाशवाडीतील कामाबाग सहकारी गृहनिर्माण संस्था राबविताना अधिकाराचा दुरूपयोग करून गैरव्यवहार केल्याप्रकरणी श्रीमती वैशाली लंबाटे, उपजिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकरण-४ यांच्याविरोधात व इतर सर्व संबंधित दोषींविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन दि. २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादर केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सादर केलेल्या निवेदनासंदर्भात तहसिलदार (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांचेमार्फत अप्परजिल्हाधिकारी (अति/निष्का) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांना दि. २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्र सादर करून त्यांनी उप जिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकरण-४ यांच्या मदतीने लाखो रूपयांचा गैरव्यवहार करून प्रकाशवाडीतील जेवढया बोगस फोटोपास बनवून त्यावर पात्रता ठरविलेली त्या सर्वांची अप्पर जिल्हाधिकारी(अति/निष्का) यांच्यामार्फत खातेनिहाय चौकशी होऊन बोगस फोटोपासधाराकांची पात्रता रद्द व्हावी आणि दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याबाबत सविस्तर चौकशी करून प्रचलित कायदे धोरण व नियमांच्या आधारे शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, तसेच अहवालाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

**श्री. अतुल सावे (२२-०३-२०२४) :**
(१) हे अंशत: खरे आहे.
मौजे गुंदवली, न.भू.क्र.८३(१ ते १७२) ८२ हे नसून, मौजे गुंदवली, ता.अंधेरी, न.भू.क्र.२६५,२६६, २६६/१ ते १७२ हे आहेत. या मिळकतीवरील प्रकाशवाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत विकासक ओमकार रिय. डेव्हलपमेंट यांना नेमले आहे.
(२) हे खरे नाही.

(३)निवेदन सादर केले हे खरे आहे. तथापि, श्री. नवीन रा.लादे हे संस्थेचे मुख्य प्रवर्तक नाहीत.
(४) पात्रता निश्चित करणे हे सक्षम प्राधिकारी यांचे, कायद्याने अर्धन्यायिक अधिकार आहेत. याविरुध्द आक्षेप/तक्रार असल्यास संबंधित झोपडीधारक/ सहकारी गृहनिर्माण संस्था हे संबंधित अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५ अन्वये अपिल दाखल करु शकतात. त्यामुळे कारवाई करण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे,वडगावशेरीमध्ये वीज पुरवठा खंडित केल्याबाबत

**(४२) ६६७९८ (२७-०९-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये उकाडा वाढला असताना काही दिवसांपासून वडगावशेरी, चंदननगर, खराडी या भागात वीज पुरवठा खंडीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पुरवठा खंडीत असल्याने विध्यार्थी तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खंडित वीजपुरवठा रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
वीज पुरवठा खंडित होताच महावितरणव्दारे वाहिनीवरील बिघाड त्वरीत दुरुस्त करुन वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येतो.
(३) नगररोड विभागातील वडगावशेरी, चंदननगर व खराडी परिसराला १३२ केव्ही खराडी, २२० केव्ही थेऊर आणि २२० केव्ही मगरपट्टा सिटी या अति उच्चदाब उपकेंद्रातून विद्युत पुरवठा होतो. या परिसरात तांत्रिक बिघाडामुळे विद्युत पुरवठा खंडीत होताच त्यावर नगररोड विभागाअंतर्गत वडगावशेरी व खराडी शाखा कार्यालयातील विद्युत कर्मचाऱ्यांसोबत विद्युत पुरवठयातील दोष दूर करुन ताबडतोब नादुरुस्त लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी पुर्ववत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव (जि.सांगली) येथे शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी महावितरणवर मोर्चा काढल्याबाबत

**(४३) ६६९०३ (२७-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगाव (जि.सांगली) येथे वीज दरवाढ कमी करा, शेतकऱ्यांना अखंड आठ तास वीज पुरवठा करा, धोकादायक तारा, पोल, डिपी दुरुस्त करा, सतत होणारी विजेची समस्या थांबवा आदी विविध प्रलंबित मागण्यांसाठी शहरातील महावितरणच्या उपमुख्य कार्यकारी अभियंता कार्यालयावर येथील शेतकऱ्यांनी हल्लाबोल मोर्चा काढून तीव्र आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित मागण्या तात्काळ पूर्ण कराव्यात अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही येथील शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे,

प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी मागणी केली होती. यासाठी शेतकऱ्यांनी दि.१०.०५.२०२३ रोजी आंदोलन केले होते.

(३) कडेगाव मधील अतिभारीत असणाऱ्या ११ के.व्ही. कडेगाव एजी वाहिनीस पर्यायी नवीन ११ के.व्ही. नेर्ली एजी वाहिनीचे काम कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत करुन घेतले आहे. यामुळे कडेगाव परिसरातील ५ गावामध्ये भारनियमन वेळापत्रकानुसार दिवसा विद्युत पुरवठा केला जात आहे.

उच्चदाब विद्युत वितरण प्रणाली योजनेअंतर्गत मंजूर असलेले ३३/११ के. व्ही. येतगाव उपकेंद्राचे काम दि. ३१.०५.२०२३ रोजी पूर्ण केले असून, नेवरी व येतगाव परिसरातील जवळपास १३ गावातील शेतकऱ्यांना दि. ३१.०५.२०२३ पासून भारनियमन वेळापत्रकानुसार दिवसा विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. तसेच कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ३३/११ के.व्ही. शिवणी उपकेंद्र व ३३/११ के.व्ही. शिरसगाव उपकेंद्र येथील अतिरिक्त ५ MVA क्षमतेच्या पॉव्रर ट्रान्सफॉर्मर उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत हिंगणगाव बु. व चिखली येथील नवीन उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. सदर धोरणांतर्गत ५६ अतिरिक्त रोहित्रांची कामे पुर्ण झाली असून, १४ रोहित्रांची २५ ते ६३ व ६३ ते १०० अशी क्षमतावाढ करण्यात आली आहे. तसेच, सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेअंतर्गत शाळगाव येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चाकूर (जि.लातूर) तालुक्यात विजेच्या ट्रान्फॉर्मरसाठी लागणाऱ्या तेलाचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४४) ६६९३० (२७-०९-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यात विजेच्या ट्रान्फॉर्मरसाठी लागणाऱ्या तेलाचा तुटवडा निर्माण झाल्याची बाब दिनांक २२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेलाचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे चाकूर तालुक्यातील अनेक गावातील डीपी बंद असल्याने विदयुतपुरवठा खंडित झाल्याने शेतपिकांचे पाण्याअभावी नुकसान होत असून नागरिकांचे देखील त्रास सहन करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विजेचा ट्रान्सफॉर्मरसाठी लागणाऱ्या तेलाचा पुरेशा प्रमाणात पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

चाकूर तालुका हा महावितरण कंपनीच्या लातूर मंडळात येत असून, दि. ०१ एप्रिल, २०२३ ते दि. ३० जून, २०२३ या कालावधीत लातूर मंडळात एकूण १०९ किलो लिटर तेलाचा साठा उपलब्ध करुन देण्यात आला होता.

माहे जून, २०२३ अखेर लातूर मंडळ कार्यालयासाठी मध्यवर्ती भांडारात २६ किलो लिटर तेलाचा साठा उपलब्ध होता.

महावितरण कंपनीमार्फत सन २०२३-२४ साठी १० हजार किलोलिटर तेलाचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी आजतागायत २,२२० किलोलिटर ऑईल उपलब्ध झाले असून उर्वरीत ऑईलचा पुरवठा प्रतिमाह १,११० किलोलिटर याप्रमाणे पूर्ण होणार असून, राज्यात सध्या १,६४७ किलोलिटर ऑईल उपलब्ध आहे. आईल अभावी ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त राहणार नाहीत याची दक्षता महावितरण कंपनीमार्फत घेण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांताक्रुझ वाकोला (मुंबई) येथील झोपडपटटी पुनर्वसन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या श्री महाकाली टेनेमेंटस एस आर ए सहकारी गहनिर्माण संस्था मर्या, चा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ६७३२३ (१०-१०-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, सांताक्रुझ येथील वाकोला,येथे न भु क्र. ३१२२ ते ३१२८,३१२९,३१२९ १ ते १६,३१३०,३१३०-१,३१३३,३१३३-१ ते७, ३१३४ व ३१३४/१ ते ४, ३१६५/अ-१,३१६५/ब या भूखंडावरील झोपडपटटी पुनर्वसन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या श्री. महाकाली टेनेमेंटस एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., चा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत व झोपडीधारकांना भाडे नियमित मिळत नसल्यामुळे झोपडीधारकांनी संबंधित विभागाकडे तक्रार करुन विकासकावर १३/२ अंतर्गत कारवाई करणेबाबत मागणी केली, सदर मागणीच्या अनुषंगाने विकासकावर कारवाई करुन त्यांची नियुक्ती रदद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडीधारकांच्या भाडयाच्या रकमेचा कांही प्रमाणात भरणा केल्यामुळे उच्चस्तरीय तक्रार निवारण समितीच्या बैठकीत त्याच विकासकाची पुन्हा नियुक्ती करण्यात आली असून, विकासकाने दि ३१ मे, २०२३ रोजीपर्यंत झोपडीधारकांना सदनिकेचा ताबा देण्याचे आश्वासन दिले होते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आश्वासनानुसार झोपडीधारकांना सदनिकेचा ताबा देण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह, झोपडीधारकांना सदनिकेचा ताबा तातडीने मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) नाही.

(५) मा.आमदार यांच्या समवेत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये दि.३०.०६.२०२३ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान विकासक यांनी साधारणत: एक ते दीड महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याचे आश्वासन दिले.

प्राधिकरणामार्फत इमारत क्र.१ मध्ये एकूण ८५ पात्र झोपडीधारकांना सदनिका वाटप करण्यात आल्या आहेत. सदर इमारतीस अद्याप भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही. तरी सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित झोपडीधारकांना ताबा देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(६)प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईमध्ये चीनी बनावटी इलेक्ट्रोनिक सिगारेटची होत असलेली विक्री

**(४६) ६७४९१ (२७-०९-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये चीनी बनावटी इलेक्ट्रोनिक सिगारेट मोठ्या प्रमाणात विकली जात असून शाळा व महाविद्यालयातील विदयार्थी इलेक्ट्रोनिक सिगारेटच्या अधिन झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कस्टम विभागाकडून वारंवार कारवाई करण्यात येत असतानांही इलेक्ट्रोनिक सिगारेटची आयात करण्यासह त्याची विक्री देखील सर्रासपणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तरुण वर्गाला आकर्षित करण्यासाठी वेगवेगळया फ्लेवर मध्ये उपलब्ध होणाऱ्या इलेक्ट्रोनिक सिगारेटमुळे तरुण वर्गाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ई सिगारेटवर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२४) :** (१), (२) व (३) मुंबईत चिनी बनावटीची इलेक्ट्रोनिक सिगारेट विक्री होत आहे हे खरे आहे. या प्रकरणी सन २०२२ मध्ये १० गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर गुन्ह्यात १७ आरोपींना अटक करण्यात येऊन रु.१३ लाख १७ हजार इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच जानेवारी,२०२३ ते ऑक्टोबर,२०२३ या कालावधीत ३० गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ४६ आरोपींना अटक करण्यात येऊन रु.०१ कोटी ३८ लाख इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) शासनाकडून सोशल मिडीया, सिनेमागृह, वृत्तपत्र याद्वारे तसेच स्वंयसेवी संस्था, पोलीस काका व पोलीस दीदीच्या मार्फतीने ई-सिगारेटच्या दुष्परीणामा बाबत शाळा, कॉलेज व गर्दीच्या ठिकाणी माहिती व प्रशिक्षण देवून जनजागृतीचे तसेच पालकांमधील जनजागृती मोहिमांचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात येत आहे. दिनांक २३.०४.२०२३ ते दिनांक ०८.०५.२०२३ या कालावधीत विशेष मोहिम राबवून शाळा व कॉलेज परिसरात अमंली पदार्थ, गुटखा विक्री व ई सिगारेट विक्री करणाऱ्या एकुण १३७१ अवैद्य पानटपऱ्यांवर संबधित नगर पालिकेच्या सहकार्याने निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. ई-सिगारेट आयात / निर्यातीसंबंधी गुन्हे करणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करणे, सदरच्या सिगारेटची विक्री करणारे व ती प्राशन करणारे यांच्यावर संबंधित यंत्रणा यांच्याकडून गुन्हे दाखल करून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील लघुपाटबंधारे तलाव विकसित करण्यासाठी जलसंपदा विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(४७) ६७५६४ (२४-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील लघुपाटबंधारे तलाव पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी जलसंपदा विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी उपमुख्यमंत्री यांना माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने लघुपाटबंधारे तलाव होटगीचा परिसर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून या कामाच्या निविदा मागवण्याची प्रक्रिया चालू आहे तथापि अद्यापही जलसंपदा विभागाकडून पर्यटन विभागास ना- हरकत प्रमाणपत्र दिले नसल्याने पुढील कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ना-हरकत प्रमाणपत्रास होणाऱ्या विलंबामुळे मंजूर असलेला निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार सदर जलसंपदा विभागाकडून पर्यटन विभागास ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय.

(२) नाही.

होटगी लघु पाटबंधारे तलाव परिसरात ३.८३ हे. जागेवर पर्यटन सोयीसुविधा निर्माण करणेसाठी नियामक मंडळ ठरावात होणाऱ्या ठरावातील अटी व शर्ती पर्यटन विभागास मान्य करणे बंधनकारक राहतील तसेच जमीनीची मालकी जलसंपदा विभागाचीच राहील, या शर्तीच्या अधीन राहून क्षेत्रीय कार्यालयाच्या दिनांक १९/१०/२०२३ च्या पत्रान्वये "ना-हरकत" पर्यटन विभागास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवळाली (जि.नाशिक) गावात अंमली पदार्थाची होत असलेली विक्री

**(४८) ६७६६५ (२७-०९-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (जि.नाशिक) गावत सिन्नरफाटा, एकलहरे रोड ते चेहेडी नाका व जयभवानी रोड या भागात अंमली पदार्थांची विक्री सर्रास सुरु असल्याने याभागातील तरुण मुले व विद्यार्थी अंमली पदार्थ्यांच्या आहारी गेल्याची बाब दिनांक ०६ मे, २३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे नशेबाज तरुण रात्री उशीरापर्यंत हातात शस्त्रे घेऊन नागरीकांवर हल्ले करीत असल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यावर आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील महावितरणकडे वीज मीटरचा तुटवडा झाल्याबाबत

**(४९) ६७८४९ (२७-०९-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व):** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे मागील काही महिन्यांपासून वीज मीटरचा तुटवडा निर्माण झाला असून अनेक ग्राहकांनी महिन्यापूर्वी अर्ज करुनही त्यांमीटर मिळत नसल्याने अंधारात दिवस काढावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ग्राहकांनी मीटर बदलुन मिळण्यासाठी अर्ज केले असतांना त्यांनाही मीटर बदलुन मिळात नसल्याने ग्राहकांचे तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन मीटर उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

अमरावती मंडळ कार्यालयाअंतर्गत माहे एप्रिल २०२३ ते जुलै २०२३ दरम्यान पैसे भरलेल्या ५९९९ ग्राहकांपैकी ४०७१ ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या असून, उर्वरित १,९२८ ग्राहकांना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

अमरावती मंडळ कार्यालयाअंतर्गत दि. १ एप्रिल २०२३ ते आजतागायत एकूण ६,६३१ ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलविण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज, (जि. बीड) तालुक्यातील RDS योजनेत मंजूर गावठाण फिडर सेपरेशन करण्याची कामे सुरु करण्याबाबत

**(५०) ६७८७७ (१४-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, (जि. बीड.) तालुक्यातील अंबाजोगाई, केज, बीड, धारूर, उपविभागातील गावठाण फिडर सेपरेशन करण्याची कामे RDS योजनेत मंजूर असून सदर कामे तातडीने सुरु करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २३.०२.२०२३ रोजीच्या पत्राव्दारे अंबाजोगाई धारुर उपविभागातील RDSS योजनेतील फीडर सेपरेशनची काम सुरु करण्याबाबतचे निवेदन मा. मंत्री (ऊर्जा) तथा उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिलेले आहे.

(२) बीड जिल्हयातील मिश्र वाहिनी विलगीकणाच्या निविदांना आवश्यक प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे सदर निविदेचे विभाजन करुन अंबेजोगाई विभागासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन बीड जिल्हयातील अंबाजोगाई विभागाअंतर्गत सुधारित वितरण क्षेत्र योजने मधील मिश्र वाहिनी विलगीकरण (फीडर सेपरेशन) च्या कामाचा कार्यादेश मे. इलेक्ट्रोपाथ सर्विर्सेस (इंडिया) प्रा.लि. यांना देण्यात आलेला आहे.

केज जि. बीड तालुक्यातील अंबाजोगाई धारुर उपविभागातील गावठाण फीडर सेपरेशन करण्याची कामे तातडीने सुरु करण्याबाबतचे निर्देश महावितरणच्या स्थानिक कार्यालयांना व कंत्राटदार यांना देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.